महाराष्ट्र शासन

E-mail: tnt१.sesd-mh@gov.in

क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र. ३८२ /टिएनटी-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१९.

प्रति,

आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
परीक्षा परिषद, पुणे.

**विषय :-** शिक्षक पात्रता परीक्षेबाबत..

**संदर्भ :-**
१) निर्णय क्र. आरटीई-२०१०/प्र.क्र.२७२/प्राशि-१ दि. १३ फेब्रुवारी,२०१३.
२) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदचे मार्गदर्शक सूचना क्र. ७६४/२०१०/ NCTG/Acad दि. ११ फेब्रुवारी, २०११
३) शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१६/प्र.क्र.३०/टीएनटी-१ दि. २४.०८.२०१८
४) संदर्भ क्र. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांचे पत्र क्र. मरापप/बापवि /२०१९/६४९४ दि. ०३ ऑक्टोबर, २०१९

आपले संदर्भाधिन दिनांक ०३.१०.२०१९ चे पत्र कृपया पहावे.

०२. राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या इयत्ता १ली ते ८ वी च्या शिक्षकांकरीता शिंक्षक पात्रता परीक्षा आयोजित करण्याकरीता पुढील प्रमाणे सूचनांचे पालन करण्यात यावे.

१. इयत्ता १ ली ते ५ वी च्या गटाकरिता प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्त करावयाच्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.। उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. इयत्ता ६ वी ते ८ वी या गटाकरिता उच्च प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्तीसाठी शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.॥ उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

३. इयत्ता ६ वी ते ८ वी या गटाकरिता उच्च प्राथमिक शिक्षकांना इयत्ता १ ली ते ५ च्या गटाकरिता नियुक्तीसाठी संबंधित शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.। उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल. म्हणजेच इ. १ ली ते ५ वी आणि इ. ६ वी ते ८ वी या दोन्ही गटासाठी नियुक्तीसाठी पेपर क्र.। व ॥ उत्तीर्ण करणे आवश्यक राहिल.

४. इयत्ता ६ वी ते ८ वी च्या गटातील उच्च प्राथमिक शिक्षकांना नियुक्तीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.॥ संबंधित उमेदवाराने त्यांनी प्राप्त केलेल्या पदवीच्या विषयानुसार राहिल. उदा. विज्ञान / गणित विषयासाठी विज्ञान / गणित विषयातील शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.॥, सामाजिकशास्त्र

शिक्षकांसाठी सामाजिकशास्त्र या विषयातील शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र. II व इतर विषयांसाठी उपरोक्त गणित/विज्ञान आणि सामाजिकशास्त्र यापैकी कोणताही एका विषयातील शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र. II उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल.

(स्वप्निल कापडणीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे.

संचालक (प्राथमिक/ माध्यमिक), महाराष्ट्र राज्य पुणे.